स्पे.मु.नं.०१/२०२३
निशाण क्र. ३४६ ची पुरवणी

**प्रतिवादी ९—ब तर्फे सा.क्र. १ यांना शपथ देण्यात आली.**

**प्रतिवादी ९—ब तर्फे सा.क्र.१ चा उलटतपास वादी तर्फे वकील श्री. डी.आर.देसाई यांचे तर्फे सुरु**

माझी जन्म तारीख २५.०८.१९९२ अशी आहे. दि.२४.०७.१९९७ रोजी माझे वडील रावसाहेब कुलकर्णी व बन्सी घाडगे या दोघांनी मौजे झरे येथील गट नं. २१२ चे क्षेत्र ०५ हे. १७आर. खरेदी करण्याबाबत साठेखत झाले होते. सदरचे साठेखत हे प्रभाकर व चंद्रकांत कुलकर्णी यांनी लिहून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे साठेखत हे प्रस्तुत मिळकतीच्या कब्जासह करून दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत साठेखतातील मजकुर खरा व बरोबर आहे. माझे वडीलांचे शिक्षण किती झाले होते ते मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील कोणत्याही कागदपत्रावर इंग्रजी भाषेत सही करत असे. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८.०५.१९९९ रोजी माझे वडीलांनी दावा मिळकती बाबत शपथपत्र न्यायालयामध्ये लिहून दिले होते. सदरचे शपथपत्र निशाण क्र.३० वर असल्याबाबत मला माहिती नाही. आता मला निशाण क्र. ३० वरील शपथपत्र दाखविले त्यावरील सही माझे वडीलांची नाही. सदर शपथपत्रामध्ये दि.१६.०४.१९९८ रोजी मिळकत खरेदी घेण्यासंदर्भात माझा हक्क सोडून देत असलेबाबत वीस रूपयेचा बॉण्ड वर मी स्वत:च्या हस्तअक्षारात लिहून दिला हा मजकुर खोटा आहे.

माझे वडीलांना मराठी लिहिता येत होते. आता मला निशाण क्र. २९६ वरील करारपत्र दाखविले ते माझे वडीलांच्या हस्तअक्षरात नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.१६.०४.१९९८ रोजी प्रस्तुतचे करारपत्र लिहून देवून त्यावर त्यांनी सही केलेली आहे. माझे वडीलांचे इतर कागदपत्रांवर हस्तअक्षर असल्याचा पुरावा मी प्रस्तुत दाव्यामध्ये दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.०१.०६.१९९८ रोजी झालेल्या खरेदी खताच्या दस्तावर माझे वडीलांची सही आहे. सन १९९८ साली माझे वडीलांचा व्यवसाय भिक्षुकी होता. तसेच सदर व्यवसायातून आलेल्या पैसामधुन आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांची आर्थिक परिस्थीती गट नं. २१२ खरेदी करण्यासारखी नव्हती. माझे वडीलांची गट नं. २१२ मिळकत खरेदी करण्यासाठी आर्थिक परिस्थिती सक्षम होती हे दर्शिविणारा पुरावा माझे कडे नाही.

हे म्हणणे खरे नाही की, माझे वडीलांनी बन्सी घाडगे यांना करारपत्राचा दस्त लिहून दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९८ मध्ये माझे वडील कुटुंबासह सोलापूर येथे राहत होते. साक्षीदार स्वत: सांगतो की, आम्ही सन १९९८ रोजी झरे येथे राहत होतो. आम्ही झरे येथे सन १९९८ साली राहत असलेबाबत आमचेकडे कागदोपत्री पुरावा आहे. तो पुरावा मी न्यायालयात हजर करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, साठेखतापोटी रक्कम रूपये २५,०००/— माझे वडीलांनी दिली होती व उर्वरित २५,०००/— बन्सी घाडगे यांनी दिली होती. सदर साठेखतापोटी रक्कम रू. २५,०००/— बन्सी घाडगे यांनी माझे वडीलांना परत दिलेबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी बन्सी घाडगे यांचेकडुन रक्कम रू. २५,०००/— माझे वडीलांनी घेतल्यानंतर करारपत्राचा दस्त स्वत:च्या हस्तअक्षरात लिहून त्यावर साक्षीदाराच्या

सहया व स्वत:ची सही केलेबाबत मला माहिती नाही. सदर करारपत्राची झेरॉक्स माझे वडीलांनी स्वत:कडे ठेवलेबाबत मला माहिती नाही. तसेच त्याची मुळ प्रत माझे वडीलांनी बन्सी घाडगे यांना दिलेबाबत मला माहिती नाही.

हे म्हणणे खरे आहे की, मी करारपत्राच्या दस्ताच्या वेळी वय वर्ष ६ असल्याने माझे वडीलांनी करून दिलेल्या करारपत्रातील मजकुराबाबत मला माहिती नाही. सदर दस्तावर बाळु काळे व मोहन बोराटे यांनी साक्षीदार म्हणुन सहया केलेबाबत मला माहिती नाही. दि.२०.०५.१९९८ रोजी प्रभाकर, ज्ञानेश्वर कुलकर्णी, चंद्रकांत कुलकर्णी यांनी वादी बन्सी घाडगे यांच्या हक्कात वचननामाचा रक्कम रू. २०/—चे स्टॅम्पवर दस्त लिहून दिला याबाबत मला माहिती नाही.

प्रस्तुत दाव्यामध्ये माझे वडीलांनी कैफियत दाखल केली होती किंवा नाही याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील वयोवृध्द होते व ते हर्ट अटॅकने मयत झाले. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत खरेदी घेणेचा हक्क केवळ वादी बन्सी घाडगे यांना आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये माझा कोणताही हिस्सा नसल्याने दावा मिळकत खरेदी घेणेचा मला अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दाव्यामध्ये झालेले साठेखत, करारनामा व वचननामा च्या वेळी मी सज्ञान असल्याने मला त्याबाबत माहिती नाही. मी सज्ञान झालेनंतर सदर दस्तांसदर्भात कायदेशिर कारवाई केली आहे. सदर कार्यवाही बाबतची कागदपत्रे प्रस्तुत दाव्यामध्ये दाखल केलेली आहेत. मी सज्ञान झालेनंतर वादी बन्सी घाडगे यांच्या विरोधात कोणतीही नोटीस व फौजदारी केस केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याचे शपथपत्रातील मजकुर खोटा आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी ९—ब तर्फे साक्षीदार क्र. १ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१५ तर्फे वकील श्री. एस.ए.रोकडे यांचे तर्फे तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत्त

(एम.पी.एखे)

दि.०३.०२.२०२४ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा